MHLA050001952023

नियमीत दिवाणी दावा क्र. ४४५/२०२३
परशुराम वि. महा. शासन वगैरे

<u>नि.क्र. ५ वरील आदेश</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–३९, नियम–१, २ प्रमाणे प्रतिवादींनी मांगदरी पाझर तलावाच्या पाळूची व सांडव्याची उंची वाढवू नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२) वादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे म्हणणे असे की, वादीच्या जमीनीलगत मांगदरी पाझर तलाव आहे. त्या तलावाच्या पाळूची व सांडव्याची उंची वाढवण्याचा प्रयत्न प्रतिवादी करीत आहेत. अशी उंची वाढवील्यास तलावातील पाणी वादीच्या जमीनीत येणार आहे व पिकांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींविरूध्द उंची वाढवू नये असा तात्तपूर्ता मनाई आदेश देण्यात यावा.

३) वादीची कथने व युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे त्याच्या निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीच्या बाजूने दाव्यामध्ये प्रथमदर्शनी परिस्थिती असल्याचे वादीने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| २) | न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजुने आहे काय ? | नाही. |

३) तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे का ? — नाही.

४) अंतिम आदेश काय ? — अंतीम आदेशाप्रमाणे.

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत** :–

४) मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यावर एकत्रीत चर्चा करीत आहे.

५) मौजे मांगदरी ता. अहमदपूर येथील जमीन गट क्र. ८० मधील क्षेत्र २हेक्टर ६२आर ही वादीच्या मालकी वहीवाटीची जमीन आहे. या जमीनीच्या उत्तरेस मांगदरी पाझर तलाव आहे.

६) वादीच्या कथनानुसार सदरचा पाझर तलाव हा चुकीच्या पध्दतीने बांधलेला असल्याने वादीस त्याचा त्रास होत आहे. तलावाचे पाणी संपादीत क्षेत्राच्या हद्दीपर्यंत न थांबता संपादीत क्षेत्र ओलांडून वादीच्या जमीनीत येत असते. त्याबाबत वादीने तक्रार करूनही प्रतिवादींनी त्याची दखल घेतलेली नाही. दोन वर्षापूर्वी हा पाझर तलाव पूर्णपणे भरून पाळूवरून पाणी खाली पडत असल्याचे पाहून प्रतिवादींनी तेथील सांडवा पाडून कमी केला व त्यामुळे पाणी पातळी त्यांना राखता आली. परंतू यावर्षी प्रतिवादींनी पाझर तलावाच्या पाळूची व सांडव्याची उंची वाढवण्याचे प्रयत्न चालू केले आहेत व त्यासाठी लवकरच कामाचे आदेश देवून काम सुरू होणार असल्याची माहिती वादीस मिळाली. पाळू व सांडव्याची उंची वाढवल्यास

तलावाच्या दक्षिण बाजुकडे असलेली वादीची जमीन पूर्णपणे पाण्याखाली जाणार आहे.

७) तलाव्याच्या पाळूची व सांडव्याची उंची वाढवण्याबाबत प्रतिवादींनी कामाचे आदेश दिल्याचे वादीचे कथन आहे. परंतू या अर्जासोबत तशा आदेशाची प्रत दाखल केलेली नाही. अशी उंची वाढवण्याबाबत प्रतिवादींकडून काही प्रस्ताव सादर झालेले असल्यास त्याबाबतचे कागदपत्र दाखल केलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी हे तलावाच्या पाळूची व सांडव्याची उंची वाढवण्याच्या प्रयत्नात आहेत या वादीच्या कथनास पुष्टी मिळत नाही. पाळू व सांडव्याची उंची वाढवण्यासाठी प्रतिवादींकडून काही हलचाली सुरू झालेल्या आहे असे दाखवण्यासाठी प्रथमदर्शनी बाबी वादीने दाखवलेल्या नाहीत. प्रतिवादींतर्फे पाळू व सांडव्याची उंची वाढवणार असल्याच्या कारणावरून त्यांच्याविरूध्द अन्य कोणी तक्रार केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी बाब वादीच्या बाजुने नाही. न्यायाचे समतुलत्व वादीच्या बाजुने नाही. तात्पुरता मनाई आदेश न दिल्यास वादीस तात्काळ नुकसान होणार आहे अशी परिस्थिती दिसून येत नाही. म्हणून या मुद्दयांचे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :–

८) मुद्दे क्र.१ ते ३ यांच्या निष्कर्षावरुन असे दिसते की, वादीने त्याचा अर्ज सिध्द केला नसल्याने तो नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## <u>आ दे श</u>

१) अर्ज नामंजूर केला आहे.

२) या अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ठ राहील.

Digitally signed by
PRASAD ANANT
SAVADIKAR
Date: 2023.07.04
17:12:30 +0530

(प्र.अ. सवदीकर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
अहमदपूर.

दिनांक :– ०४/०७/२०२३.